# महाराष्ट्र पोलीस कल्याण योजना





## महाराष्ट्र पोलीस कल्याण योजना

# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना
२. महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीचा आढावा
- i) लक्ष्य आणि उद्दिष्ट्य
- ii) संघटना आणि प्रशासन
- iii) सदस्यत्व
- iv) लेखा व लेखापरीक्षण
- v) उत्पन्न साधने
- vi) विनियोग

३. महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी योजना आणि उपक्रम
- i) सेवा
- ii) आरोग्य
- iii) शिक्षण

४. भविष्यातील वाटचाल





# प्रस्तावना

महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची स्थापना फेब्रुवारी १९८० मध्ये शासनपत्र, गृह विभाग क्र. पी.डब्ल्यू.एफ. - ०३७/३००९५-पोल-७, दि. २२-२-१९८० अन्वये महाराष्ट्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेली आहे.

समाजाच्या सुरक्षेसाठी पोलीस विभाग अविरत कार्यरत असतो त्यामुळे त्यांच्या कामकाजाच्या स्वरुपात शारिरीक कष्टांसोबतच मानसिक तणाव देखील आढळतो. कामाची अनिश्चित वेळ व अनपेक्षित स्वरुप यासाठी कारणीभूत आहेत. म्हणनूच पोलीसांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विशिष्ट काळजी घेण्याची आवश्यकता भासते. पोलीस कल्याण निधीचा उगम याच उद्देशाने झाला असून, याचा उपयोग फक्त पोलीस कर्मचारी/अधिकारी व त्यांच्या रक्ताच्या नातलगांसाठीच मर्यादित आहे. हा निधी आर्थिक मदतीसोबतच महाराष्ट्रातील पोलीस कुटुंबांचे आयुष्य सुधारण्याकरिता योजना व उपक्रमांद्वारे साधनसुविधा पुरवितो.

पोलीस दलाच्या गरजा पुरवण्यासाठी पोलीस कल्याण निधीने अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केलेली आहे. याच सर्व योजनांची माहिती पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याला असावी, या उद्देशाने ही पुस्तिका प्रकाशित करण्यात येत आहे. महाराष्ट्र पोलीसचा प्रत्येक घटक स्वतःच्या हद्दीत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन, पगारातून चौमाही वर्गणीची कपात करुन व व्यावसायिक उपक्रम राबवून आणि नियमावलीतील नमूद मार्गांनी कल्याण निधी उभारतो.

प्रत्येक घटक आपल्या कल्याण निधीतून एक ठराविक रकमेचा भाग मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी मध्ये जमा करतो. कल्याणासाठी खर्च करण्याचे मुबलक स्वातंत्र्य व अधिकार देऊन विकेंद्रीकरणाची सोय घटक कल्याण निधीच्या स्तरावती दिली गेली आहे. सगळ्या घटकांची, विशेषतः कमी उत्पन्न असलेल्या घटकांची, पोलीस कल्याण उपक्रमांसाठी लागणारी अतिरिक्त आर्थिक गरज, मध्यवर्ती कल्याण निधी द्वारे संपूर्ण केली जाते.

महाराष्ट्रातील पोलीस कल्याण उपक्रमांचे विभाजन साधारणतः तीन विषयांमध्ये कलेले आहेः

१. सेवा
२. शिक्षण
३. आरोग्य

गेल्या काही वर्षांपासून, महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीचे विशेष लक्ष विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण व नोकरी संपादन, पोलीसांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि कौटुंबिक जीवन उत्कृष्ट करणाऱ्या सुविधा यांच्याकडे आहे. यानुसार खालील नमूद योजना निधीच्या प्रमुख योजना मानल्या गेल्या आहेतः

**१. गुणवंत विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना :**

**अ)** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM), नॅशनल लॉ स्कूल (NLS), नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NIT) मध्ये व सी.ई.टी.(CET) द्वारे वैद्यकीय अथवा दंतमहाविद्यालयामध्ये प्रथम वर्षात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना **रु. २५,०००** ची शिष्यवृत्ती.

**ब)** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) मध्ये आय.आय.टी.-जे.ई.ई (IIT-JEE) अथवा एन.ई.ई.टी.(NEET) द्वारे किंवा एम.बी.बी.एस.(MBBS) अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना **रु. १,००,०००** ची शिष्यवृत्ती.

**२. बिनव्याजी उच्च शिक्षण कर्ज :**

**रु ५०,०००** पर्यंतचे वार्षिक बिनव्याजी कर्ज.

३. ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींकरिता प्रोत्साहन म्हणून **रु. ५००** चे **बस्ता अनुदान.**

४. **महाराष्ट्र दर्शन LTC** अंतर्गत पोलीसांसाठी **रु. १०००** चे अनुदान.

५. पोलीस वसाहतींमध्ये **ग्रीन पार्क** (हरित उद्यान) ची उभारणी.

पोलीसांच्या आरोग्यासाठी महाराष्ट्र शासनाने **महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना (MPKAY)** २००५ साली सुरु केली. याचबरोबर, जुलै २०१७ पासून, शासनातर्फे ४५ वर्षांवरील पोलीसांची **वार्षिक आरोग्य तपासणी** सुरु केली आहे. पोलीस दलाचा परिपूर्ण विकास व्हावा म्हणून मानसिक स्वास्थ्याचा देखील पोलीस कल्याण अंतर्गत समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची पुढील वाटचाल वसाहतींमध्ये हरित व शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याची, पाल्यांच्या उत्तुंग शिक्षण भरारीसाठी प्रयत्नांची व पोलीस कुटुंबांसाठी संपूर्ण स्वास्थ्य आणि आनंदाची हमी देण्याची आहे.



# आढावा

## महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम

## १. लक्ष्य आणि उद्दिष्ट्ये

१९८० साली महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली पहिल्यांदा प्रस्तुत करण्यात आली असून, कालांतराने त्यात आवश्यकतेनुसार बदल सुद्धा करण्यात आले आहेत. त्यातील सर्वात अलीकडील बदल ६ जुलै २०१५ ला केला गेला आहे.




आकृती १ : कल्याणाद्वारे कार्यक्षमतेत वाढ

| | |
|---|---|
| काय? | पोलीसांना व त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य व सामाजिक मदत देण्याकरिता महाराष्ट्र पोलीस विभागाने स्थापन केलेला एक निधी. |
| कसे? | सदस्यांची वर्गणी, व्यावसायिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, शासन देणगी तसेच सार्वजनिक देणगी यांपासून आलेली रक्कम. |
| का? | पोलीसांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याण, विकास आणि सहाय्यासाठी. |

हा निधी केवळ सदस्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी सुरु केला आहे. निधीच्या संसाधनांच्या अंतर्गत कल्याणासाठीच्या उपाययोजना चालू करून त्या राबविणे हा निधीचा मूळ उद्देश आहे. परस्परांच्या सहकार्यामुळे आणि सहाय्यामुळे कल्याणकारी उपक्रम यशस्वी होऊ शकतात. याच कल्याणकारी योजनांचे परिणाम पोलीसांच्या उत्तम कार्यप्रदर्शनातून दिसून येतात.

# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम

## २. संघटना आणि प्रशासन

**महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी** मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटकांचा (बृहन्मुंबई दल वगळता) समावेश आहे. या निधी मध्ये पोलीस मुख्यालयातील मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी असून, अनेक घटक पोलीस कल्याण निधी सामील आहेत. जसे की - आयुक्तालय, जिल्हा, राज्य राखीव पोलीस बल गट, प्रशिक्षण संस्था, गुन्हा अन्वेषण विभाग, मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, विशेष कृती दल, फोर्स वन व इतर प्रादेशिक किंवा प्रशासकीय घटक.

**मंडळः** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी (मपोकनि) व घटक पोलीस कल्याण निधी (घपोकनि) यांची स्वतंत्र सल्लागार समिती आहे. पोलीस कल्याण नियमांनुसार आपापल्या परिक्षेत्रातील कल्याण उपक्रम राबविण्याची जवाबदारी समितीची आहे.


**सभाः** आवश्यकतेनुसार समितींची सभा घेतली जाते, ६ महिन्यातून किमान एकदा.

दोन स्तरांवरील कल्याण निधीची स्थापना आणि निधीच्या प्रशासनाकरिता घटकस्तरीय सल्लागार समितीची स्थापना घटकांना निर्णय स्वातंत्र्य व विकेंद्रीकृत अधिकार मिळवून देते. घपोकनि सल्लागार समितीची संघटना पुढीलप्रमाणे आहेः

घपोकनिचे प्रशासन घटक प्रमुख पाहतातः अपोमसं (गु. अ. वि), आयुक्त (रा. गु. वि), पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, समादेशक (रा.रा.पो. ब.), पोमनि (मो.प.वि.), संचालक (बि.सं.वि., म. गु.प्र., म. पो. अ.), प्राचार्य (प्रशिक्षण संस्था).

घपोकनिच्या सचिवाचे काम पुढील अधिकारी करु शकतातः पोलीस अधीक्षक (गु.अ.वि), उप आयुक्त, पोनि (कल्याण/स्था.गु.शा.), पोनि (मुख्यालय), पोनि (म.पो.वि. / प्रशिक्षण संस्था), सहा. समादेशक (रा.रा. पो. ब.)

घपोकनिचे सदस्य पुढील अधिकारी राहू शकतातः विपोमनि (गु.अ. वि), संयुक्त आयुक्त (रा.गु.वि), उप आयुक्त, सहा. पोलीस अधीक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी, पोलीस उप अधीक्षक (गृह), सहा. समादेशक (रा.रा.पो.ब), पोलीस अधीक्षक (मो.प.वि.,बि.सं.वि.), उपप्राचार्य (प्रशिक्षण संस्था.)




आकृती २ : सल्लागार समितींची वाढ



# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम

## ३. सदस्यत्व

पोलीस विभागातील कर्मचारी व अधिकारी यांचे सदस्यत्व श्रेणीनुसार एक तर सक्तीचे किंवा ऐच्छिक राहते. त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी आपोआप कल्याण निधीचे कायमस्वरुपी सदस्य होतात. पोलीसेत्तर कायमस्वरुपी नेमणूक झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना निधीचे सदस्यत्व ऐच्छिक आहे. तसेच लिपीक वर्ग अ ते ड यांना सुद्धा सदस्यत्व ऐच्छिक आहे.

पोलीस कॉन्स्टेबल ते पोलीस महासंचालकांपर्यंत सगळेच पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत. परंतु आर्थिक मदत आणि योजनांचा लाभ फक्त पोलीस निरीक्षक व त्याखालील पदांसाठी आणि लिपीक वर्गातील सदस्यांसाठी आहे.

घटक पातळीवर पावतीसाठी डिमांड रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. तसेच नमूद रजिस्टरच्या छपाईचा खर्च संबंधित घटक निधीतून करणे अपेक्षित आहे. प्रत्येक योजनेसाठी वेगळे पुस्तक व कल्याण निधीची एक रोकडवही असणे आवश्यक आहे. सदस्यांची चौमाही वर्गणी दर वर्षाच्या एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर महिन्यांत त्यांच्या पगारातून कापली जाते. ही चौमाही वर्गणी नुकतीच २०१७ मध्ये वाढवण्यात आलेली आहे.

| अनु.क्र. | पदनाम | दर |
|---|---|---|
| १ | पोलीस महासंचालक/अपर पोलीस महासंचालक | ७५० |
| २ | विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस उप महानिरीक्षक/ पोलीस अधीक्षक | ६०० |
| ३ | पोलीस उप अधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त | ४०० |
| ४ | पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक | २५० |
| ५ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस शिपाई | १५० |

तक्ता ३.१ : सक्तीचे सदस्यत्व शुल्क

| अनु.क्र. | पदनाम | दर |
|---|---|---|
| १ | पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उप सहाय्यक (गट अ) | ६०० |
| २ | पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक (गट ब) | ४०० |
| ३ | प्रशासकीय अधिकारी/वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/ कार्यालय अधीक्षक/लघुलेखक (गट क) | २५० |
| ४ | प्रमुख लिपिक/लिपिक कर्मचारी/कार्यालयीन शिपाई व स्वच्छक (गट ड) | १५० |

तक्ता ३.२ : वैकल्पिक सदस्यत्व शुल्क (लिपिक)

# ४. लेखा व लेखापरीक्षण

मध्यवर्ती कल्याण निधीची रक्कम एका वैयक्तिक लेखाखात्यात तसेच इतर सर्व घटक निधींच्या रकमा संबंधित घटकांच्या वैयक्तिक लेखाखात्यात जमा करण्यात येतात. पोलीस कल्याण निधीने नेमलेल्या बाह्य लेखापरीक्षकाद्वारे दर वर्षी पूर्वनिश्चित पद्धतीने लेखापरीक्षण करणे अपेक्षित आहे. पोलीस कल्याण निधीचे व्यवहार इतर शासकीय व्यवहारांपासून सक्तीने वेगळे ठेवून एकत्रित न करण्याची दक्षता घेतली जाते. कल्याण निधीसाठी काम करणाऱ्या लिपीकांना पुढीलप्रमाणे दर महा मानधन देण्यात येते: **५०० रुपये प्रत्येकी** (घटकातील १ लिपीक; मध्यवर्ती स्तरावरील १ लिपीक व १ कक्ष अधिकारी)

पोलीस कल्याण निधी अंतर्गत प्रत्येक कार्यालयात खालील नोंदवह्या असणे अपेक्षित आहेत:

**घटक मुख्यालयात:** जडवस्तूसंग्रह नोंदवही, रोकडवही, प्रत्येक योजनेसाठी वेगळे रजिस्टर.

**उपघटक कार्यालयात (पोलीस ठाणे) :** रोकडवही आणि प्रत्येक योजनेसाठी वेगळे रजिस्टर.

राज्याच्या पोलीस दलाकरिता नियम तयार करण्याचा अधिकार, पोलीस दलाच्या प्रशासनासंबंधीच्या कोणत्याही प्रयोजनासाठी निधी स्थापन करण्याचा अधिकार, त्यांची व्यवस्था पाहणे व त्यांचे विनियमन करण्याचा अधिकार- हे सर्व अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांना महाराष्ट्र शासनाने प्रदान केलेले आहेत.

**अ. मपोकनि वैयक्तिक खातेवही लेखा:**

**खात्याचे नाव :** पोलीस महासंचालक तथा अध्यक्ष यांच्या नावाने आणि सचिवाद्वारे चालविण्यात येते

**बँकेचे नाव :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

**खात्याचे प्रकार :** चालू खाते

आवश्यकतेनुसार मपोकनिची रक्कम बचत किंवा चालू खात्यात अथवा मुदत ठेव स्वरुपात कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात येऊ शकते. ऍक्सिस बँकेत मपोकनिचे बचत खाते आहे.

**ब. घपोकनि वैयक्तिक खातेवही लेखा :**

**खात्याचे नाव :** घटक प्रमुख यांच्या नावाने

**बँकेचे नाव :** कोणतीही राष्ट्रीयकृत अथवा शेड्यूल्ड बँक

**खात्याचे प्रकार :** चालू किंवा बचत खाते / मुदत ठेव / घटक कोषागार.

ज्या अधिकाऱ्यांच्या नावाने वैयक्तिक खाते लेखावही अथवा बचत खाते चालू करण्यात आले असेल, त्यांच्या पदीय नात्यानेच या संबंधातील व्यवहार त्यांनी करणे अपेक्षित आहे. असा प्राधिकारी, त्याला पदीय नात्याने कनिष्ठ असलेल्या व्यक्तीकडे निधीच्या प्रशासनाच्या प्रयोजनासाठी एखादे काम सोपवू शकेल आणि निधीच्या प्रशासनाच्या संबंधातील ही नेमणूक त्या व्यक्तीच्या पदीय नात्याने अपेक्षित राहील.





# ५. निधीची उत्पन्न साधने

घटक स्तरावर चालविण्यात येणाऱ्या उपक्रमांद्वारे मिळालेल्या रकमेचे विभाजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे: २५% रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी मध्ये जमा होते व उर्वरित ७५% घटक पोलीस कल्याण निधी मध्ये राखली जाते.

**देणग्या :**

१०,००० रुपये व त्यावरील रक्कम देणगी म्हणून स्वीकारण्यात येऊ शकते. सर्व देणग्यांकरिता मध्यवर्ती कल्याण निधीच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असते. पोलीसांची नियमित कामे प्रभावित होतील अशा संस्था, जसे की कंत्राटदार, बिल्डर, बांधकामाशी संबंधित पुरवठादार, हॉटेल / बार मालक, तंबाखू / मद्यपान उत्पादक व विक्रेते, सराफ, इ. यांच्याकडून देणग्या घेणे प्रतिबंधित आहे.

**व्यावसायिक उपक्रम :**

पोलीस कल्याण निधीचे पैसे उभारण्यासाठी काही ठराविक व्यावसायिक उपक्रमांस मान्यता देण्यात आलेली आहे. ते बाजूस नमूद केल्याप्रमाणे आहेत:

| मपोकनिची उत्पन्न साधने |
|---|
| घटकाच्या उपक्रमांमधून मिळालेली २५ % रक्कम |
| मपोकनिला मिळालेल्या देणग्या |
| मपोकनिची सदस्य वर्गणी |
| शासकीय अनुदाने |
| पोलीस खेळाडूंनी जिंकलेल्या रकमेतील १०% वाटा |

तक्ता ५.१ : मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी

| घपोकनिची उत्पन्न साधने |
|---|
| घटकाच्या उपक्रमांमधून मिळालेली ७५% रक्कम : सांस्कृतिक कार्यक्रम, पेट्रोल पंप, मंगल कार्यालये, बहुउद्देशीय कार्यालये, विश्रामगृहे, पोलीस क्लब, कॅन्टीन, उपाहारगृह, सदस्य वर्गणी, गॅस एजन्सी, बेकरी, किराणादुकान, केशकर्तनालय |
| देणग्या |
| मपोकनिकडून मिळालेले अग्रीम व अनुदान |
| पोलीस खेळाडूंनी जिंकलेल्या रकमेतील १०% वाटा |
| पोलीस बँडची २५% रक्कम |
| गुंतवणुकीवरील व्याज |
| पोलीस को-ऑपरेटिव्ह सोसायटी च्या नफ्यातील २०% |

तक्ता ५.२ : घटक पोलीस कल्याण निधी

# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम

## ६. निधीचा विनियोग

पोलीस कल्याण निधीचा वापर कल्याणाचे विविध उपक्रम चालविण्यासाठी व उत्पन्न अधिक वाढवून त्यांना सुरु ठेवण्यासाठी केला जातोः

१. **वैद्यकीय अग्रीम / कर्ज किंवा अनुदानः** ज्या औषधोपचारांचा खर्च शासकीय वैद्यकीय प्रतिपूर्तीने होत नाही अशांसाठी.

२. **शैक्षणिक मदत / सुविधाः** पोलीस अधिकारी / कर्मचारी व सदस्य असलेले पोलीस विभागातील इतर शासकीय कर्मचारी यांच्या पाल्यांकरिता.

३. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सानुग्रह आणि अंत्यविधी अनुदान.

४. कला, साहित्य, क्रीडा व स्पर्धा यांसाठी प्रोत्साहन.


५. कौशल्य विकासासाठी अनुदान व प्रशिक्षण.

६. सोयीसुविधांचे बांधकाम व त्यांची देखभाल.

७. उपक्रमांतील तज्ञांचे मानधन.

८. शाळेची बस, उद्याने, ग्रंथालये, अभ्यासिका, मनोरंजन केंद्रे, रेडिओ, टी. व्ही., पाण्याची टाकी व शुद्धीकरण, इ.

आकृती ६.१ मध्ये कल्याण योजना आणि उपक्रम यांची विभागणी दिलेली आहे - सेवा, शिक्षण आणि आरोग्य. तक्ता ६.२ मध्ये खर्चाचे अधिकार व मर्यादा नमूद केल्या आहेत.




आकृती ६.१: योजना आणि उपक्रम

| अनु क्र. | पदनाम | खर्चाचे अधिकार |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक/समादेशक/प्राचार्य समकक्ष दर्जाचे घटक प्रमुख | २,५०,००० |
| २ | विपोमनि दर्जाचे परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/घटक प्रमुख व विपोमनि (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई | ७,००,००० |
| ३ | अपर पोलीस महासंचालक दर्जाचे आयुक्त/पोलीस आयुक्त/संचालक/प्रमुख घटक; अपर पोलीस महासंचालक(प्रशासन) | १०,००,००० |
| ४ | पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई | १०,००,००० पेक्षा अधिक |

तक्ता ६.२ : खर्चाचे अधिकार



# महाराष्ट्र पोलीस कल्याण योजना आणि उपक्रम



# सेवा


सब्सिडीअरी कॅन्टीन, उस्मानाबाद


विश्राम गृह, नागपूर


पेट्रोल पंप, सांगली


हॉलीडे होम, औरंगाबाद


महिला विश्रामकक्ष, सेलू



## १. सब्सिडीअरी कॅन्टीन

**काय :** सीएसडी कॅन्टीनचा हा उपक्रम बाजारपेठेतील वस्तू बाजार दरापेक्षा कमी किंमतीत पोलीस कुटुंबांना उपलब्ध करण्याच्या हेतूने सुरु करण्यात आला आहे. विक्रीच्या २% फरकाने मिळालेला नफा हा उत्पन्न होय. नफ्यातील २५% रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीकडे पाठवली जाते व उर्वरित ७५% घटक निधीमध्ये जमा करण्यात येते.

**कोणासाठी :** सेवेत असलेले व निवृत्त झालेले पोलीस कर्मचारी / अधिकारी आणि मंत्रालयीन कर्मचारी / अधिकारी, आणि कुटुंब सदस्यांसाठी.

**कसे :**

बीएसएफ / आर्मी कॅन्टीन मधून मालाची खरेदी → कॅन्टीन मध्ये स्टॉक करणे → ओळख पत्र दाखवणे → स्वस्त दरातील वस्तू विकत घेणे

**कोठे :** सर्वसाधारणपणे पोलीस कॉलनी मध्ये अथवा जवळ स्थित आहेत. ओळख पत्र दाखवून संपूर्ण महाराष्ट्रातील कुठल्याही कॅन्टीनचा वापर होऊ शकतो.

सध्या राज्यात ४८ **सब्सिडीअरी कॅन्टीन** कार्यान्वित आहेत.

## २. शॉपिंग कॉम्प्लेक्स

**काय :** बाह्य व्यावसायिकांकरिता आणि पोलीस कुटुंबातील लघु उद्योजकांकरिता एक व्यावसायिक संकुल. यातून मिळणारे भाडे हे कल्याण निधीसाठी उत्पन्न ठरते. २५% रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीकडे पाठविली जाते आणि उर्वरित ७५% रक्कम घटक निधीमध्ये जमा केली जाते.

**कोणासाठी :** पोलीस कर्मचारी, त्यांची कुटुंबे आणि सामान्य नागरिक यांसाठी.

**कसे :** किराणा दुकाने, बेकरी, पिठाच्या गिरण्या, कापड दुकाने, कॅन्टीन, इ. च्या भाड्याच्या माध्यमातून.

**कोठे :** हे कॉम्प्लेक्स सामान्यतः पोलीस वसाहतींमध्ये / नजीकच्या परिसरात आणि बाजार परिसरामध्ये आहेत.



शॉपिंग कॉम्प्लेक्स, जालना

## ३. गॅस एजन्सी

**काय :** पोलीस कल्याण निधीने सदस्यांसाठी गॅस कनेक्शन पुरवण्याची तरतूद सुरु केली आहे.

**कोणासाठी :** ही सेवा मुख्यत्वे पोलीस कुटुंबीयांसाठी आहे. काही ठिकाणी घरपोच सेवा सुद्धा करण्यात येते. मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीला २५ % नफा दिला जातो.

**कसे :**

गॅस कंपनी कडून माल घेणे → गोडाऊन मध्ये ठेवणे → सभासद नोंदणी व सामान्य दरात विक्री करणे

**कोठे :** सामान्यत: पोलीस कॉलनीत अथवा त्या जवळ.

सध्या राज्यात **११ गॅस एजन्सी** आहेत.



गोडाऊन




रक्षक गॅस सेवा, औरंगाबाद

## ४. पेट्रोल पंप

**काय :** पोलीस कल्याण निधीने नागरिक इंधन सेवा पुरविण्याची तरतूद सुरु केली आहे.

**कोणासाठी :** पोलीस कर्मचारी आणि सामान्य जनतेसाठी ही सुविधा उपलब्ध आहे. ७५% - २५% प्रमाणे रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी आणि घटक पोलीस कल्याण निधी मध्ये विभागली जाते.

**कसे :** तेल आणि वायू कंपन्यांकडून थेट इंधन खरेदी करुन नागरिकास पंपावरती विक्री केली जाते. पेट्रोल पंपाची उभारणी आणि देखभालीची जबाबदारी कंपनीद्वारे असून घटकाच्या निदर्शनाखाली होते.

**कोठे :** पंप केवळ पोलीस विभागाच्या मालकीच्या जमिनीवर, शहरांच्या मुख्य रस्त्यांवर वसलेले आहेत.

सध्या ३६ जिल्ह्यांमध्ये, **४८ पेट्रोल पंप** (अधिकृत व मंजूर) आहेत.



## ५. विश्राम गृह / पोलीस क्लब

**काय :** मूलभूत सुविधांसह दैनिक भाडेतत्वावर विश्रांतीगृह आणि हॉलिडे होम्स.

**कोणासाठी :** अधिकृत कामासाठी किंवा सुट्टीकरिता सेवेत असलेले आणि सेवानिवृत्त झालेले सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबी यांसाठी.

**कसे :** वापरात नसलेले बराक अथवा कोणतेही वास्तू विश्रामगृहामध्ये रुपांतरित करुन किंवा नवीन बांधून वापरले जाऊ शकतात. २५%-७५% नियमानुसार हे उत्पन्न निधीमध्ये जमा केले जाते.

**कोठे :** खासकरुन पर्यटनक्षेत्र, तीर्थक्षेत्र, हिल स्टेशन इत्यादींच्या ठिकाणी व मुख्य शहरांमध्ये.

सध्या महाराष्ट्रात **५५ विश्रामगृहे व १८ पोलीस क्लब** आहेत.



ऑफिसर मेस, वर्धा

## ६. बहुउद्देशीय सभागृह

**काय :** विवाह, कार्यशाळा इतर कार्यासाठी भाड्याने देण्यात येणारे एक सभागृह.

**कोणासाठी :** सामान्य जनतेस तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी भाड्याने उपलब्ध.

**कसे :** सभागृहाचे भाडे हे उत्पन्नाचा स्त्रोत असून, त्याचा वापर करण्यासाठी पूर्वपरवानगीची आवश्यकता असते. सामान्य जनतेसाठी आणि पोलीसांसाठी दर वेगळे ठेवण्यात आलेले असून अधिकारी / कर्मचारी यांकरिता सवलत शुल्क लागू आहे.

सध्या राज्यात एकूण **३८ बहुउद्देशीय सभागृह** आहेत.



शोभा प्रकाश मंगल कार्यालय, जालना

## ७. रोजगार योजना

**काय :** पोलीस पाल्यांमधील कौशल्य व गुणवत्ता यांचा मेळ घालून, नोकरीची संधी उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**कसे :** नोकरी मेळाव्यामध्ये सहभागी कंपन्या पोलीस पाल्यांचा बायोडाटा पाहून मुलाखत घेतात. जर कंपन्यांच्या गरजेप्रमाणे पूर्तता होत असेल, तर या योजने अंतर्गत पोलीस मुलांना नोकऱ्या मिळू शकतात.

**कोठे :** **औरंगाबाद, पुणे, ठाणे, नाशिक** येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन २०१६-१७ मध्ये केले होते. २०१८ पासून, सर्व परिक्षेत्रांमध्ये दरवर्षी रोजगार मेळावे, समुपदेशन केंद्र आणि कौशल्य प्रशिक्षण यांचे आयोजन होत आहे.



**रोजगार मेळावा, पुणे शहर**



**रोजगार मेळावा, औरंगाबाद**

## ८. समाधान हेल्पलाईन

**काय :** पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय समस्यांचे निवारण फोनवरुन करण्यासाठी ही मदत केंद्रे २०१६ पासून स्थापित करण्यात आली आहेत. यामुळे प्रशासनामध्ये पारदर्शकता येऊन कार्यक्षमता वाढली आहे.

**कसे :**

मुख्यालयातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती → दुविधेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मुख्यालयात फोन → मुख्यालयात नोंद व निवारण → उत्तर व अभिप्रायासाठी मुख्यालयातून फोन

**कोठे :** सध्या **६३** ठिकाणी ही सुविधा चालू आहे.

## ९. महाराष्ट्रात दर्शन रजा प्रवास सवलत :

**काय :** नियमित रजा प्रवास सवलती व्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना अतिरिक्त **एक हजार रुपये** प्रवास भत्ता म्हणून कल्याण निधीतून देण्यात येतो. पोलीस कॉन्स्टेबल पासून सहाय्यक फौजदारापर्यंतच ही योजना लागू असून, ही रक्कम राज्य सीमेतील प्रवासासाठीच वैध आहे.

**कसे :**

रजेसाठी अर्ज करणे → १००० रुपये अधिक भत्ता मिळणे

२०१६ पासून आजपर्यंत जवळजवळ **१७८५ कर्मचाऱ्यांनी** या योजनेचा लाभ घेतला आहे.



## १०. अत्यंविधी अनुदान

**काय :** कर्तव्य बजावत असताना किंवा अन्यथा मृत्यू पावलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना दिली जाणारी रक्कम.

**कोणासाठी :** मृत व्यक्तीचे अंतिम संस्कार करण्यासाठी पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांच्या पती/पत्नी किंवा जवळच्या नातेवाईकांना पैसे दिले जातात.

**खर्च :** मृत व्यक्तींना त्यांच्या मूळ गावी पोचवण्यासाठी लागणारा वाहतुकीच्या खर्चासाठी (वाहन + इंधन) अनुदान म्हणून **१२,००० रुपये** देण्यात येते.

२०१६-१७ मध्ये **३९,३६,००० रुपये (३२८ कर्मचारी)** आणि २०१७ साली **२६,१६,००० रुपये (२१८ कर्मचारी)** मृतांच्या नातेवाईकांना वितरित केले आहे.

## ११. सानुग्रह अनुदान

**काय :** कर्तव्य बजावत असताना किंवा अन्यथा मृत्यू पावलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना दिली जाणारी रक्कम.

**कोणासाठी :** पोलीस निरीक्षक व त्याखालील पदांसाठी हे अनुदान लागू आहे. मृताच्या पदानुसार कुटुंबातील सदस्यांना सानुग्रह रकमा दिल्या जातात.

**खर्च :** आधी घटक पोलीस कल्याण निधीमधून हे अनुदान दिले जाते आणि नंतर ही रक्कम महाराष्ट्र शासनाच्या अनुदानातून पुनर्प्राप्त केली जाते.

२०१६-१७ मध्ये **७०,५६,८०० रुपये (३२८ कर्मचारी)** आणि २०१७ साली **४७,६१,६०० रुपये (२१८ कर्मचारी)** मृतांच्या नातेवाईकांना वितरित केले आहे.

नक्षल भागात नक्षलविरोधी कारवाईत शहिद होणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांस **रु. २०,००,०००** पर्यंत चे सानुग्रह अनुदान केंद्र शासनाच्या सुरक्षाविषयक खर्च योजनेतून दिले जाते.

| अनु. क्र. | पदनाम | रक्कम | १९ वर्षांखालील ३ पाल्यास प्रत्येकी |
|---|---|---|---|
| १ | पोनि / सपोनि | ३०,००० | १,००० |
| २ | पोउपनि | २५,००० | १,००० |
| ३ | सपोउपनि | २०,००० | ८०० |
| ४ | पोह | २०,००० | ८०० |
| ५ | कर्तव्यावरती मृत्यू | ५०,००० | १,००० |

**सानुग्रह अनुदानाच्या रकमा**

## १२. महिला विश्रामगृह

**काय :** पोलीस ठाण्यामध्ये महिलांच्या व प्रसाधनाच्या सोयीसाठी.

**कोणासाठी :** महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विश्रांतीची जागा.

**कसे :** पोलीस स्थानकांमध्ये नवीन बांधकाम करून या विश्राम गृहांची स्थापना करण्यात येते.

## १३. जलशुद्धीकरण आणि पुरवठा

**काय :** पोलीस स्थानके आणि पोलीस वसाहतींमध्ये जेथे स्वच्छ पेय पाणी मिळणे आवश्यक आहे, अशा ठिकाणी रिव्हर्स ऑस्मोसिस (आर.ओ.) तंत्रज्ञानासह पाण्याच्या शुध्दीकरणाची सोय.

**कोण :** पोलीस कर्मचारी आणि त्यांची कुटुंबे निरोगी पाण्याचा लाभ घेतात.

**कसे :** पोलीस वसाहतींमध्ये आर.ओ. शुध्दीकरण प्रकल्प स्थापन करून, पोलीस ठाण्यांमध्ये पाण्याचे फिल्टर बसवून हे केले जाते.

**कोठे :** बीड, दौंड, पुणे, मुंबई, नागपूर इ.





**आर. ओ. शुध्दीकरण प्रकल्प, बीड**

## ८. इतर

**शाळेची बस :** पोलीसांच्या वसाहतींपासून दूर असलेल्या शाळांमध्ये जाण्यासाठी पोलीस पाल्यांना बस सेवा प्रदान केली जाते. बस सेवेचा उपभोग घेणाऱ्या मुलांमध्ये इंधनाचे दर विभागून, त्यांच्या पालकांच्या वेतनातून याची कपात केली जाते. अशा प्रकारे बस सेवा ना नफा ना तोटा योजनेवर चालते. राज्यात सध्या **५** पोलीस बस चालत आहेत.

**एटीएम :** पोलीस कर्मचारी आणि सामान्य जनतेच्या वापरासाठी पोलीस मालकीच्या परिसरात याची स्थापना केली जाते. डिसेंबर २०१६ पासून एटीएम उभारण्यासाठी बँकांसोबत करार करून हे ठिकठिकाणी चालू केले आहे. सध्या राज्यात **२०** एटीएम आहेत.

पोलीस वसाहतींमध्ये **मनोरंजन केंद्रे, पाण्याची टाकी आणि कूलर** ची सोय सुध्दा पाहायला मिळते.



**स्कूल बस**



## शिक्षण



संगीत विद्यालय, बीड



पोलीस विद्यालय, बुलढाणा



औरंगाबाद पोलीस पब्लिक स्कूल



ग्रंथालय, जालना



होतकरू विद्यार्थ्यांचे कौतुक, नवी मुंबई

## १. उच्च शिक्षण कर्ज

**काय:** हे पोलीस पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी दिले जाणारे एक बिनव्याजी कर्ज आहे. सन २०१६ पासून ही योजना सुरु आहे.

**कोणासाठी:** बी.ए.एम.एस (BAMS),बी.एच.एम.एस (BHMS), बी.टेक (B.Tech),बी.सी.ए.(BCA),एम.सी.ए.(MCA) साठी व्यवस्थापन महाविद्यालये अथवा कोणत्याही शासन मान्यताप्राप्त अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळालेल्या पोलीस पाल्यांसाठी.

**मर्यादा:** एका वर्षात **५०,००० रुपयापर्यंत.** मागील कर्जाची परतफेड केल्यानंतरच नवीन कर्ज मंजूर होऊ शकते. कर्ज पुन्हा मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना मागील वर्षी किमान ६० गुण मिळाले पाहिजेत.

**कसे:** परतफेडीचा कालावधी मंजुरीच्या तारखेपासून एक वर्ष आहे.

कर्जासाठी अर्ज करणे → प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका जमा करणे → घटक प्रमुखाकडून मान्यता मिळणे

**कोठे:** उल्लेख केलेल्या अभ्यासक्रमांसाठी नमूद केलेल्या संस्थांकरिता ही योजना लागू आहे.

१९८ पाल्यांना आजपावेतो एकूण **९८,९०,००० रुपये** शैक्षणिक कर्ज म्हणून देण्यात आले आहेत.

## २.उच्च शिक्षण शिष्यवृत्ती

**काय:** ही उच्च शिक्षणासाठी गुणवत्ता आधारित शिष्यवृत्ती २०१६ पासून सुरु आहे.

**कोणासाठी:** सी.ई.टी.(CET),एन.ई.ई.टी.(NEET)/जे.ई.ई.(JEE)द्वारे नमूद संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या पोलीस पाल्यांसाठी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यापर्यंतच आणि सदस्य असलेले लिपीक यांसाठी). ही योजना केवळ पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी लागू असून देणगी भरुन घेतलेल्या पोलीस पाल्यांना लागू नाही.

**रक्कम:** विविध अभ्यासक्रमांसाठी तीन प्रकारच्या शिष्यवृत्त्या आहेत :

अ) सी.ई.टी.(CET) च्या माध्यमातून इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट(IIM), नॅशनल लॉ स्कूल (NLS), नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी(NIT), कोणत्याही दंत महाविद्यालयातील पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना **२५,००० रुपये.**

ब) आय.आय.टी.-जे.ई.ई (IIT-JEE)/एन.ई.ई.टी.(NEET) द्वारे इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) मध्ये किंवा एम.बी.बी.एस.(MBBS) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना **१ लाख रुपये.**

क) **मुलींसाठी विशेष पदव्युत्तर शिष्यवृत्ती :** व्यावसायिक अभ्यासक्रमातील पदव्युत्तर वैद्यकीय (MD,MS), अभियांत्रिकी (ME,MTech), विधी (LLM) व व्यवसाय व्यवस्थापनातील (MBA,CA,CS) शिक्षण पूर्ण करणाऱ्या **मुलींसाठी २५,००० रुपयांची विशेष शिष्यवृत्ती.**

आजपर्यंत **१३२** हून अधिक विद्यार्थ्यांना **३३,००,००० रुपये** शिष्यवृत्ती च्या स्वरुपात मिळाली आहे. या योजनेचे लाभार्थी शैक्षणिक कर्ज योजनेचा देखील लाभ घेउ शकतात.



## ३. बस्ता अनुदान

**काय:** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी **५०० रुपये** दप्तरासाठी अनुदान म्हणून देण्यात येते. ही योजना २०१७ मध्ये सुरु केली आहे.

**कोणासाठी:** **५वी ते १०वी** मध्ये शिकणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलींकरीता.

**मर्यादा :** प्रत्येक कर्मचाऱ्याच्या (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांपर्यंतच) **दोन मुलींपर्यंतच** हे अनुदान दिले जाते.

**कसे :** दर वर्षी ३१ ऑगस्ट च्या आत मुलींची नावे प्रत्येक पोलीस स्थानकांतून मुख्यालयात सादर होतात. बोनाफाईड प्रमाणपत्राची आवश्यकता लागत नाही.

आजपावेतो **१०८७ मुलींना ५,५३,५०० रुपयांचे** बस्ता अनुदान देण्यात आले आहे.



## ४. पुस्तक अनुदान

**काय :** शैक्षणिक पाठ्यपुस्तकांच्या खरेदीसाठी दिले जाणारे गुणवत्ता आधारीत हे अनुदान आहे.

**कोणासाठी :** **५ वी पासून पदव्युत्तर पदवी पर्यंत** शिकत असलेले पोलीस कर्मचारी (पोलीस निरीक्षकापर्यंत), शहीद आणि प्रशासनिक लिपीक यांच्या पाल्यांसाठी.

**कसे :** निकाल जाहीर झाल्यांनतर ३ महिन्यांच्या आत निकालाचे कागदपत्रे जमा करुन हे अनुदान पात्रतेनुसार प्राप्त होते.

२०१६-१७ मध्ये या योजनेच्या लाभार्थींना **६४,१७,९५० रुपये** इतकी रक्कम देण्यात आली आहे.


| अनु क्र. | वर्ग | टक्के | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ५ वी ते १० वी | ८५ | १,२५० |
| २ | ११ वी ते १२ वी | ८० | २,५०० |
| ३ | पदवी | ७० | ३,७५० |
| ४ | डिप्लोमा | ६५ | ३७५० |
| ५ | अभियांत्रिकी पदवी | ६५ | ८७५० |
| ६ | वैद्यकीय पदवी | ६५ | १८,७५० |

तक्ता: वर्गवार पुस्तक अनुदान रक्कम (सुधारित)

## ५. पोलीस पब्लिक स्कूल

विविध नामांकित शैक्षणिक न्यासांच्या सहकार्याने राज्यात पोलीस कल्याण निधीच्या **१० शाळा** चालविण्यात येत आहेत. शाळेतील कमीतकमी ५० जागा पोलीस पाल्यांसाठी राखीव ठेवली जातात आणि शुल्कामध्ये २५% ते ५०% सवलत देण्यात येते. पूर्व-प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण सध्या दिले जात आहे.

ठाणे, पुणे, सोलापूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, बुलढाना, उस्मानाबाद, चंद्रपूर आणि रा.रा.पो.बल गट क्र. ७ मधील शाळांमध्ये एकूण **८,२१५ विद्यार्थी** सध्या शिकत आहेत.



ठाणे पोलीस स्कूल



अमरावती पोलीस पब्लिक स्कूल

## ६. इतर

**१. करियर मार्गदर्शन केंद्रे: ८ वी ते १२ वी** मध्ये शिकत असलेल्या पोलीस पाल्यांसाठी करिअर मार्गदर्शन केंद्राची स्थापना जिल्हा आयुक्तालय स्तरांवर केली आहे. योग्यता चाचणीवर आधारित हा उपक्रम राबविला जातो. **ठाणे, नाशिक आणि औरंगाबादमध्ये** हा उपक्रम सप्टेंबर २०१६ पासून सुरु आहे.

**२. बालवाडी :** पोलीस कल्याण निधीतून चालविल्या जाणाऱ्या या प्राथमिक शिक्षण संस्था आहेत. सध्या महाराष्ट्रात **३५ बालवाड्या** कार्यान्वित आहेत.

**३. वाचनालय व अभ्यासिका :** पाल्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अभ्यासाकरिता **४६ वाचनगृहे** महाराष्ट्रात विविध ठिकाणी चालू आहेत.

**४. प्रशिक्षण केंद्रे :** स्पर्धा परीक्षा / खेळ / नृत्य / संगीत / संगणक / कौशल्य - आधारित प्रशिक्षण देणे; कुटुंबातील उत्पन्न निर्मितीची क्षमता वाढवण्यासाठी हस्तकला, शिवणकाम, सुतारकाम इ. आणि इतर व्यवसाय गुंतवणुकीसाठी चे प्रशिक्षण देणे - हे केले जाते. कोचिंग वर्गासोबत सहयोग विविध ठिकाणी सुरु करण्यात आले आहेत.

**५. पाळणाघर :** राज्यात **२१ पाळणाघर** चालू आहेत.



पाळणाघर,नागपूर शहर



## आरोग्य



आरोग्य शिबीर, रत्नागिरी



बालोद्यान, नागपूर



व्यायामशाळा, बीड



योग सत्र, गोंदिया



पोलीस इस्पितळ, नागपूर

## १. वैद्यकीय अग्रीम:

**काय:** वैद्यकीय गरजांसाठी **बिनव्याजी अथवा अल्पव्याजी कर्ज.**

**कोणासाठी:** पोलीस कर्मचारी आणि कुटुंबीयांसाठी, राज्य सरकारने नमूद केलेल्या ३२ आजारांव्यतिरिक्त आजारांवरील उपचारांसाठी.

**कसे:** मंजूरी मिळाल्यानंतर ३ महिन्यांनी पगारातून कपात सुरू केली जाते. १८ महिन्यांनंतर १०% व्याजदरासह पगारातून कपात सुरु होते.

**मर्यादा:** एकूण पुनर्प्राप्ती होईपर्यंत नवीन कर्ज मंजूर होऊ शकत नाही.

**अपवाद:** परिस्थितीनूसार व्याजदर अथवा थोडी किंवा पूर्ण कर्ज माफी, पोलीस महासंचालक कार्यालयाच्या निर्णयान्वये, होऊ शकते.

**खर्च:** घटक पोलीस कल्याण निधी मधून व कर्जाची रक्कम जास्त असल्यास मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी मधून, हे कर्ज दिले जाते.


सप्टेंबर २०१७ पर्यत **७.१९ कोटी रुपये** एकूण कर्ज म्हणून वितरित केले आहे.

## २.महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना (MPKAY):

**काय:** २००५ सालापासून महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली असून, याद्वारे **कॅशलेस** (विना रोकड) वैद्यकीय उपचार रुग्णांना दिले जातात.

**कोणासाठी:** पोलीस कर्मचारी आणि कुटुंबीयांसाठी केवळ उल्लेख केलेल्या **३२ आजारांकरिता (२७ आकस्मिक + ५ गंभीर).**

**कसे:** पोलीस महासंचालक कार्यालय इस्पितळ आणि तृतीय पक्षीय एजन्सी (टी.पी.ए) सोबत करार करते. खाजगी रूग्णालयांची नेमणूक पॅनलवर केली जाते आणि सी.जी.एच.एस.च्या (CGHS) दरानुसार त्यांच्या सेवेसाठी त्यांना पैसे दिले जातात.




**कोठे:** राज्यातील नेमलेल्या **१७० रुग्णालयांमध्ये (१४१ महाराष्ट्र व २९ मुंबई मधील)**

२०१६-१७ मध्ये एकूण खर्च **७३ कोटी रुपये** आणि नोव्हेंबर २०१७ पर्यंत **२६ कोटी रुपये** एवढा होता.

या योजने अंतर्गत समावेश असलेल्या आजारांची यादी पुढे दिली गेली आहे.



## MPKAY योजने अंतर्गत असलेले आजार :

| | |
|---|---|
| २७ आकस्मिक आजार | हृदय विकाराचा झटका /प्रमश्तिक संहनी / फुफ्फूसांच्या विकाराचा झटका/ ऍन्जिओग्राफी चाचणी |
| | अति रक्तदाब |
| | धनुर्वात |
| | घटसर्प |
| | अपघात/आघात संलक्षण/हृदयरोगविषयक किंवा रक्तवाहिनीसंबंधी समस्या |
| | गर्भपात |
| | तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध |
| | तीव्र रक्तदाब |
| | गॅस्ट्रोएन्टेरायसिस |
| | विषमज्वर (टायफॉईड) |
| | निश्चेतनावस्था |
| | मनोविकृतीची सुरूवात |
| | डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे |
| | स्त्रीरोगविषयक आणि प्रसुतीविषयक आकस्मिकआजार |
| | जननमूत्र विषयक आकस्मिक आजार |
| | वायू कोथ |
| | कान,नाक किंवा घशातील आकस्मिक आजार |
| | जन्मजात असंगतीमध्ये तातडीची शस्त्रक्रिया |
| | ब्रेन ट्यूमर (मेंदूतील गाठ) |
| | भाजणे |
| | एपिलेप्सी |
| | तीव्र काचबिंदू |
| | मज्जारज्जूविषयक आकस्मिक आजार |
| | उष्माघात |
| | रक्तसंबंधित विकार |
| | प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा |
| | रसायनामुळे होणारी विषबाधा |
| ५ गंभीर आजार | हृदय शस्त्रक्रिया |
| | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया |
| | ऑंजिओप्लास्टी |
| | मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया |
| | रक्ताचा कर्करोग |

## ३. वैद्यकीय तपासणी

**कायः** जुलै २०१७ पासून वार्षिक आरोग्य तपासणीची सुविधा राज्य सरकारकडून सुरू आहे.

**कोणः** **४५ वर्षांपेक्षा जास्त वय** असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी.

२०१६-०७ मध्ये, **२६,००० कर्मचाऱ्यांची** तपासणी पूर्ण झाली आहे.

## ४.पोलीस दवाखाना/इस्पितळ कुटुंब नियोजन केंद्र

**कायः** मूलभूत आरोग्य तपासणी सेवा मोफत पुरविण्याकरिता पोलीस वसाहतीत दवाखाने व रुग्णालये यांची स्थापना.

**कोण :** पोलीस कर्मचारी आणि कुटुंबीयांसाठी.

**कसेः** शासकीय दवाखान्यातील डॉक्टर किंवा पोलीस इस्पितळांतील डॉक्टर डेप्युटेशनवरती नियुक्त केले जातात.

राज्यात **५९ पोलीस रुग्णालये** कार्यरत आहेत.

## ५. योग प्रशिक्षण

**कायः** २०१६-१७ मध्ये पोलीसांच्या मानसिक आणि शारिरीक आरोग्यासाठी, केंद्रसरकारकडून आलेल्या योग प्रशिक्षण योजनेचे आयोजन पोलीस कल्याण निधी मधून केले जात होते.

**कोणासाठीः** संपूर्ण पोलीस दलासाठी.

**कसेः** योग संस्था त्यांच्याकडील तज्ञांना पोलीसांचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवतात.

७४ घटकांमध्ये योग शिबीर आयोजित केले गेले आहेत.

## ६. i CALL मानसिक स्वास्थ्य हेल्पलाईन

**कायः** टाटा सामाजिक विज्ञान संस्था या संस्थेद्वारे कार्यशाळा आणि मानसिक आरोग्य हेल्पलाईन चे आयोजन केले गेले आहे.

**कोणः** पोलीस कॉन्स्टेबल ते स.पो.म.नि पदांच्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी.

**कसेः** राज्यभरात मानसिक आरोग्य कार्यशाळेचे आयोजन करून, त्यासाठी एक हेल्पलाईनची स्थापना सुद्धा केली आहे.

**कोठेः** २०१७ मध्ये पहिल्यांदाच सर्व परिक्षेत्रांमध्ये यशस्वीरित्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.



## अपघात विमा योजना

### १. समूह व्यक्तिगत अपघात विमा योजना (पोलीस कर्मचारी):

**काय :** राज्य पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसाठी ही एक गट विमा योजना आहे.

**कसे :** **२७६ रुपये** वार्षिक प्रीमियम आकारला जातो. आकस्मिक दाव्यांच्या संदर्भात झालेल्या नुकसान भरपाईची संख्या जखमांच्या टक्केवारीनुसार **१० लाखांपर्यंत** असू शकते.

**कोणासाठी :** संपूर्ण पोलीस दलासाठी - पोलीस कॉन्स्टेबल ते पोलीस महासंचालकांपर्यंत.

२०१६-१७ मध्ये, **४१ कर्मचाऱ्यांना ४.१० कोटी रुपये** दिले गेले आहेत.

### २. समूह व्यक्तिगत अपघात विमा योजना (शासकीय कर्मचारी) :

**कायः** ०१/०४/२०१७ पासून राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी समूह विमा सुरु करण्यात आला आहे. ही सरकारी योजना पोलीसांसाठी देखील उपलब्ध आहे.

**कसेः** **३४५ रुपये** वार्षिक प्रीमियम आकारला जातो. आकस्मिक दाव्यांच्या संदर्भात प्राप्त झालेल्या नुकसान भरपाईची संख्या जखमांच्या टक्केवारीनुसार **१० लाखांपर्यंत** असू शकते.

**कोणासाठीः** पोलीसांसह सर्व सरकारी कर्मचारी /अधिकाऱ्यांसाठी.

## इतर

### विशेष पोषण आहार अनुदान :

महिला पोलीसांच्या पहिल्या प्रसूतीच्या वेळेस तिला **५,००० रुपयांचे** अनुदान व जन्म झालेले अपत्य मुलगी असल्यास **अतिरिक्त ५,००० रुपयांचे** अनुदान **सुदृढ बालिका अनुदान** म्हणून देण्यात येते. गरोदरपणात आरोग्याचा दर्जा वाढावा म्हणून या योजना चालू केल्या आहेत.

### मुलांचे खेळाचे उद्यान आणि खेळाचे मैदान/अभ्यासवर्ग :

क्रीडा, कला, साहित्य. इ. च्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना स्पर्धेचा खर्च पोलीस कल्याण निधी मधून दिला जातो.

### क्रीडा केंद्र :

बॅडमिंटन कोर्ट / जलतरण तलाव / लॉन टेनिस कोर्ट / बास्केटबॉल कोर्ट / टेबल टेनिस, इ.

### व्यायामशाळा :

पोलीस कर्मचारी, कुटुंब आणि सामान्य जनतेसाठी. महाराष्ट्रात **४२ व्यायामशाळा** कार्यरत आहेत.

### शारिरीक सहाय्य साधने :

चष्म्यासाठी एकवेळी **५०० रुपये** ची देणगी.

श्रवण यंत्रे, कृत्रिम अवयवांसाठी एकवेळी **५,००० रुपये** ची देणगी.

# भविष्यातील वाटचाल

महाराष्ट्र पोलीस दलाच्या कल्याणासाठी आजपावेतो उचललेल्या पावलांचा महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीला अभिमान आहे. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे जीवन आणखी सुखद करण्याचा निधीचा हेतू असून, येणाऱ्या काळात खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

### १. मानसिक स्वास्थ्य व त्यासंदर्भातील संवेदीकरण :

मानसिक स्वास्थ्यासाठी मदत केंद्रे स्थापित करण्याचे निधीचे मानस आहे. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशियल सायन्स (TISS) द्वारे हेल्पलाईन चालू करून या दिशेकडे वाटचाल सुरु झालेली आहे.

### २. पर्यावरण अनुकूल दृष्टिकोन :

पोलीस वसाहतीत नवीकरणीय स्त्रोत ऊर्जेचा वापर व कचरा कंपोस्टिंग द्वारे **ग्रीन लाईन्स आणि ग्रीन पार्क्स (हरित उद्यान)** ची स्थापना.

### ३. पोलीस कुटुंबातील मुलींचे महत्व वाढवण्यासाठी प्रोत्साहन योजनांचे प्रयोजन :

मुलींसाठी **विशेष उच्च शिक्षण शिष्यवृत्ती** व मुलींच्या शालेय शिक्षणासाठी **बस्ता अनुदानाची** सुरुवात केलेली असून, इतर योजनांची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे. पोलीस स्टेशन मध्ये आलेल्या महिलांशी संवाद साधताना कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीत या योजनांचा अनुकूल परिणाम दिसून येण्याची संभावना आहे.



### ४. शिक्षण :

विशेषतः **उच्च शिक्षण**, यावर पोलीस कल्याणाचा भर असून, यासाठी नवीन योजना व उपक्रमांमधून अधिक कामगिरी होणार आहे.



महाराष्ट्र पोलीस

# महाराष्ट्र पोलीस कल्याण योजना

## पोलीस कल्याण निधी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि उपक्रम